ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 9 | MAY - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय संविधान आणि स्त्री स्वातंत्र्य




प्रा. डॉ. विष्णू बब्रुवान वाघमारे
इतिहास विभाग प्रमुख, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी
प्रा. सरला ब्रह्मदेव चव्हाण
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा विभाग - इतिहास

## प्रस्तावना :-

प्राचीन काळी म्हणजेच सिंधु संस्कृतीच्या कालखंडामध्ये मातृसत्ताक संस्कृती सुखा समाधानाने आपल्या देशामध्ये नांदत होती परंतू आर्यांनी केलेल्या आक्रमणामुळे येथील सिंधू संस्कृती नष्ट झाली. त्यानंतर मातृसत्ताक संस्कृती जावून पितृसत्ताक संस्कृती आपल्या देशात सुरु झाली ती आजपर्यंत चालूच आहे.पितृसत्ताक संस्कृतीचा प्रभाव भारतीय संविधान लागू झाल्यानंतर काही प्रमाणात कमी झाली आहे.

भारतामध्ये आर्य स्थिर झाल्यानंतर त्यांनी भारतीय समाजाला गुलामीत ठेवण्यासाठी वेगवेळी धर्मशास्त्रे निर्माण केली व त्या धर्मशास्त्राद्वारे स्त्री आणि शुद्र यांना साखळदंडानी बांधून टाकावे त्याप्रमाणे बांधून टाकले. ब्रिटिश भारतात व्यापारी म्हणून आले परंतू ते राज्यकर्ते बनले. त्यावेळी त्यांनी येथील समाजव्यवस्थेमध्ये बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरु केले परंतू येथील प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांनी म्हणजेच धर्माच्या ठेकेदारांनी त्यांना विरोध केला. तरीसुध्दा त्यांनी १८२९ साली लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी कायदा करुन ‘अमानुष’अशी सतीची चाल कायद्याने बंद केली.

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये भारतीय संविधान व हिंदू कोडबिल यामुळे भारतीय स्त्रीयांमध्ये जो आमुलाग्र बदल झाला आहे. तो इतिहास येथे मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

## उद्दिष्ट्ये :-

1) प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांच्या परिस्थितीचे अवलोकन व्हावे.
2) भारतीय संविधान व हिंदू कोडबिल याद्वारे भारतीय स्त्रीयांना मिळालेले हक्क अधिकार व स्वातंत्र्य याचे महत्व कळावे.

आपल्या देशामध्ये भारतीय संस्कृती हा ‘शब्दप्रयोग’ ज्या काही विचारधारांनी प्रचलित केला. त्यामध्ये ग्रंथप्रामाण्य किंवा शब्दप्रामाण्य हाच धर्म मानणारी वैदिक विचारधारा प्रमुख म्हणून मानली जाते. परंतु संस्कृतीला ‘बटीक’ समजणारी एक प्रवृत्ती भारतात स्तिर झाली. आणि ह्याच प्रवृत्तीने ‘दास्य’ नावाच शोध लावला. स्वामीत्व आणि सेवकत्व अशी भाषा निर्माण केली. त्या विचारधारेने मानवी समाजाचे विभाजन करणे हे त्यांचे धोरण असल्याने त्यासाठी त्यांनी त्यांना अनूसरुन अशा ‘धर्मग्रंथांची’ निर्मिती केली. भारतामध्ये मानवी इतिहासात ‘दास्य’ आणि शोषण हे समानार्थी शब्द पिढ्यान् पिढ्या आपल्या देशात चालू आहेत. या विचारधारेनेच मानवी मूल्यांचा

ऱ्हास करुन असहिष्णूता आणि अनूदारता जन्मास घातली आणि त्या दास्याच्या व शोषणाच्या प्रतीक शूद्र आणि स्त्रियांना ठरवले गेले.[१]

भगवान बुध्द हे इतिहास पुरुष आहेत. तसेच संस्कृतीपुरुष आहेत. शुद्र आणि स्त्री यांना स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मिळवून देण्याचे अतिशय महत्वाचे कार्य त्यांनी केलेले आहे. बहुजनांच्या सुखाचा आणि हिताचा विचार करणारा महान 'धम्मपुरुष' होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्द धम्माला शरण जाण्याचे निश्चित करुन दाखवले. खऱ्या अर्थाने स्त्रियांना मुक्तीचा मार्ग भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी दाखवलेला आहे.[२]

बुध्द कालखंडाकडून आंबेडकर युगाकडे येताना स्त्री अस्तित्वाचा आणि स्त्री सामर्थ्याचे अनेक पैलू प्रतीत होतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानववंशशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ होते. त्यामुळे त्यांचा स्त्री विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भूतदयावादी नव्हता तर बुध्दांप्रमाणेच त्यांना स्त्री - पुरुष समानता अभिप्रेत होती हेच आपल्या लक्षात येते.[३]

आपल्या भारत देशामध्ये अशी काही धर्मशास्त्रे मानली जातात. त्या धर्मशास्त्रांनी समाजिक/सांस्कृतिक/आर्थिक परिवर्तनाला विरोध करण्याचे पिढ्यान पिढ्या काम केले आहे. भारतीय संविधान २६ जानेवारी १९५० ला आपल्या भारत देशामध्ये लागू झाले अणि काही प्रमाणात परिवर्तनाला सुरुवात झाली. त्याचा परिणाम म्हणजे सरपंच व राष्ट्रपती पदावर स्त्री विराजमान होताना दिसत आहेत. म्हणजेच जी धर्मशास्त्र 'मानवतावाद' विसरुन गेली होती. ती 'मानवता' भारतीय संविधानाने स्त्रीयांबरोबरच सर्व शुद्रांना बहाल केली आहे. स्वांतत्र्य, समता व बंधुत्व प्रस्थापित करुन समाजिक न्याय देण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आहे.[४]

भारतातील धर्मशास्त्रामुळे व जातीव्यवस्थेमुळे मृतप्राय जीवन जगायला लागलेल्या स्त्रियांना व अस्पृश्यांना चेतना देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. या आपल्या भारतीय संविधानाने स्त्रियांना आत्मसन्मानाचे स्वातंत्र्य आणि समतेचे जीवन बहाल केले आहे. त्यामुळेच शतकानु शतकाचा अंधार भेदून आज स्त्री-पुरुष सन्मानाने जगताना दिसत आहेत. [५]

समानता म्हणजे सर्व नागरिकांचा सारखंच मोल होय. समानता म्हणजे सारखेपणा नव्हे. मानवानिर्मित भेदाभेद नष्ट करणे, सर्वांना विकासाची समान संधी देणे हा समानतेचा अर्थ आहे. आपल्या देशातील पारंपारिक रुढी-परंपरेने, पिढ्यानपिढ्या विषमतेची वागणूक दिली. त्यामुळे स्त्रीयांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय विकास खुंटलेला होता. त्यांना समान पातळीवर आणणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आवश्यक वाटले आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती-जमाती, आदिवासी, बालक यांच्याबरोबरच तमाम भारतीय महिलांना विशेष सवलती बहाल केल्या आहेत.[६]

समानता म्हणजे स्पर्धात्मक बरोबरी नव्हे तर स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व कौटुंबिक, निर्णयामध्ये 'सक्रिय' सहभाग होय. आतापर्यंतचे असे सर्व निर्णय हे पुरुषच घेत होते. नैसर्गिकदृष्ट्या स्त्री-पुरुष भिन्न आहेत परंतु दोघांनी मनमोकळे व समान जीवन जगावे असा यापाठीमागचा हेतू आहे.

स्वातंत्र्यापूर्वी महिलांना पुरुषांच्या तुलनेत दुय्यम/गौण स्थान होते. कोणतेही नेतृत्व किंवा निर्णय घेण्यास सक्षम नाहीत असा शिक्काच येथील व्यवस्थेने मारुन ठेवला होता. भारतीय संविधानाने महिला व पुरुषांना समान अधिकार देवून सर्वच क्षेत्रात सामाजिक समानता प्रस्थापित करण्याचे महान कार्य केलेले आहे.

भारतीय महिलांनी आपल्या बुध्दिमत्ता व कठीण परिश्रमाच्या जोरावर आपली योग्यता विविध क्षेत्रामध्ये सिध्द केलेली दिसून येत आहे. सीमा सुरक्षा दल, भारतीय वायुसेना हे क्षेत्र सुध्दा अपवाद नाहीत. हे सर्व संविधानाने दिलेले कायदेशीर स्वातंत्र्य, शिक्षण व अंगी असलेल्या गुणवत्तेमुळे त्या नेत्र दिपक यश मिळवताना शक्य झाले. महिलांचे यश हे संविधानातील समानतेचे प्रतिक आहे. समाजाने महिलांविषयी बदलेल्या सामाजिक दृष्टीकोनाचा

परिणाम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला व पुरुषांना 'नागरिक' असे म्हटले आहे. कायद्याद्वारे त्यांनी लैगिंक भेदभाव संपवून टाकला आहे.[७]

राज्य, जात, धर्म, वंश, लिंग, ठिकाण व भाषेच्या आधारावर भेदभाव करणार नाही. राज्य सर्व नागरिकांना समान वागणूक देऊन सामाजिक विषमता दूर करेल. यासाठी कलम 14 मध्ये कायद्यापुढे समानता याद्वारे सर्वांना कायद्यांचे समान संरक्षण देईल तसेच सर्व कायदे सर्व नागरिकासांठी सारख्या प्रमाणात लागू केली तर कलम १५ मध्ये केवळ धर्म, वंश, जात, लिंग व जन्मस्थान या आधारावर भेदभाव करण्यास मनाई घालण्यात आली तसेच कलम १६ मध्ये सार्वजनिक नोक-यांमध्ये सर्वांना समान संधी म्हणजेच धर्म जात, लिंग, इ. कारणावरुन भेदभाव करता येणार नाही. अशा प्रकारे कायद्याने भारतीय स्त्रियांना 'सक्षम' बनन्यासाठी संरक्षण दिलेले आहेत.[८]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते नव्हे ते आहेतच. तसेच दलितांचे नेते म्हणूनही त्यांची ओळक आहे. त्याचबरोबर ते स्त्रियांचे सुध्दा कैवारी आहेत दलितांपर्माणेच स्त्रियांनाही या देशामध्ये हीन वागणूक दिली जात होती. त्यामुळे दलितांप्रमाणेच स्त्रियांबद्दलही त्यांना अपार सहानुभूती होती. कुटूंबातील स्त्रियांचे हाल कमी व्हावेत म्हणून त्यांनी घटस्फोट, पोटगी , पुर्नविवाह, वडिलोपार्जित तसेच पतीच्या संपत्तीत वारसा, दत्तक घेण्यास स्वातंत्र्य वगैरे हक्क अधिकार देणाऱ्या हिंदू कोड बिलाची अतिशय कष्ट करुन अभ्यासपूर्ण निर्मिती केली. एवढ्यावरच ते थांबले नाही तर ते मंजूर करण्यासाठी आग्रह धरला आणि विशेष म्हणजे ज्यावेळी हे विधेयक पास/मंजूर झाले नाही तेंव्हा त्यांनी आपल्या केंद्रिय कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.[९]

हुंडा ही पध्दत आपल्या देशामध्ये प्रचलित आहे. कायद्याने या पध्दतीला बंदी घातलेली आहे. तरीसुध्दा हुंडा दिला आणि घेतला जातो. या हुंड्याच्या रुपाने जी संपत्ती मुलींना विवाहासंगी दिली जाते. तरीसुध्दा त्या मुलींवर अन्याय अत्याचार होतो. तेंव्हा त्यांची यामधुन सुटका करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'हिंदू कोडबिल' हे विधेयक स्त्रियांच्या हिताचे निर्माण केले होते. त्यामध्ये अशी तरतूद केली की, त्या संपत्तीचा उपयोग त्या स्त्रीच्या हाती राहील आणि जेव्हा ती अठरा वर्षाची होईल तेंव्हा ती त्या मालमत्तेवर हक्क सांगण्यास पात्र होईल. इतके महान मानवतावादी कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बील द्वारे स्त्रियांना हक्क व अधिकार बहाल करुन त्यांना सक्षम बनविण्याचे महान कार्य केलेले आहे.[१०]

समस्त भारतीय महिलांसाठी हे विधेयक होते. प्रारंभी हे विधेयक मंजूर होवू दिले नाही. या विधेयकाला विरोध करण्यासाठी समिती स्थापन केली, आंदोलन केले, धमक्यासुध्दा त्यांना देण्यात आल्या, विरोध करण्यासाठी संघटना तयार केल्या होत्या. तरीसुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर डगमगले नाहीत. खऱ्या अर्थाने पिढ्यान पिढ्या येथील समाज व्यवस्थेने सर्वच स्त्रियांना विविध बंधनाद्वारे साखळदंडानी बांधून टाकले होते. तिचे स्वातंत्र्य नाकारले होते. ती स्त्री या बिलाद्वारे मोकळा श्वास घेणार होती. स्वातंत्र्य उपभोगणार होती. म्हणूनच येथील प्रतिगामी/सनातनी विचाराच्या लोकांना हे मान्य नव्हते. म्हणूनच हे विधेयक पास/मंजूर होऊ दिले नाही. हे विधेयक पास/मंजूर केले नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या केंद्रीय कांयदेमंत्री पदाचा राजीनामा देवून मंत्रींडळातून बाहेर पडले.[११]

## निष्कर्ष :-

येथील भारतीय धर्मशास्त्रांनी आणि त्यानुसार अंमलबजावणी करणाऱ्या समाजव्यवस्थेने स्त्रियांचे सर्व हक्क अधिकार व स्वातंत्र्य अपवाद वगळता नाकारले होते. नव्हे तशी त्यांना हीनतेची वागणूक दिली जात होती.

भारतीय संविधान आणि हिंदू कोडबिल याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समस्त भारतीय स्त्रियांना मुक्त/स्वतंत्र करुन स्वातंत्र्य उपभोगण्यास सक्षम बनविले. त्यामुळेच आपल्या देशाचे चित्र आज वेगळ दिसत आहे. स्त्रिया आज विविध क्षेत्रात उदा. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

तरीसुध्दा आज विविध समस्या निर्माण होताना आपणास दिसून येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले चिंतन भारतीय समाजव्यवस्था आणि समाजरचनेतील अनेकानेक विसंगती यांचे यथायोग्य आकलन करण्यामध्ये भारतीय समाज कमी पडत असल्याने आज विविध अशा जटिल समस्यांना तोंड देण्याची आमच्यावर वेळ आली आहे.

भारतीय संविधान आणि हिंदू कोडबिल यांची अंमलबजावणी जर येथील शासनाने/राज्यकर्त्यांनी सुव्यवस्थित केली तर देशाचे चित्र बदलायला वेळ लागणार कारण कायदे असून सुध्दा मुली, महिला यांच्या अत्याचारामध्ये वाढ होताना दिसत आहे हे आपल्या देशाचे दुर्दैव आहे. कायदे चांगले असून सुध्दा काही ठिकाणी त्यांचा योग्य उपयोग होत नाही असे चित्र दिसत आहे.

### संदर्भसूची :-


1) मूलजाधव सुशिला, भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, प्रथम आवृत्ती, मातोश्री रमाबाई आंबेडकर स्मृतिदिन 27 मे 2006, कौशल्य प्रकाशन N-11, C-3 24/3 इडको, औरंगाबाद, पृष्ट क्र. 11
2) उपरोक्त पृष्ट क्र. 12
3) उपरोक्त पृष्ट क्र. 13
4) आगलावे प्रदिप, महान समाजशास्त्री बाबासाहेब डॉ. आंबेडकर, अनुवाद : मीना काम्बले, प्रथम संस्करण: 2005 (बुध्दाब्द 2549), सम्यक प्रकासन 32/3 क्लब रोड, पश्चिम पुरी चौक, नई दिल्ली-63, पान नं. 178
5) सावरकर सुनिता, ढोर-चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परिघ, पहिली आवृत्ती : 14 ऑक्टोबर 2023, प्रकाशन – ग्रंथाली, माहिम (पं.) मुंबई 100016 पृष्ट क्र. 5
6) सोनवणे स्वप्निल-लेखक, मोरे विठ्ठल : संपादक, भारतीय संविधानाची उद्देशिका, शारदा प्रकाशन : राणे संतोष, ओमसाई प्रसाद, शिवाजीनगर, बी केवीन, नोपाडा, ठाणे (प.) 400602, पृष्ट क्र. 58
7) उपरोक्त पृष्ट क्र. 59
8) उपरोक्त पृष्ट क्र. 41
9) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, तृतीयावृत्ती : नोव्हेंबर 2006, प्रकाशक : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य & संस्कृती मंडळ मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, दादर, मुंबई – 400014, पान नं. 114
10) उपरोक्त, पृष्ट क्र. 284
11) उपरोक्त, पृष्ट क्र. 285 & 286